दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

अहिल्यानगर येथे प्रसिद्ध बेकरीचा परवाना निलंबित

मुंबई : अन्न आणि औषध प्रशासनाने (FDA) छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसी येथील 'रॉयल बेकर्स अँड कन्फेक्षनर्स' या बेकरीवर कठोर कारवाई करत तिचा अन्न परवाना तात्काळ निलंबित केला आहे. एका सजग ग्राहकाने विकत घेतलेल्या कप केकमध्ये प्लास्टिक आणि रबरचे तुकडे आढळल्याची तक्रार एफडीएकडे केली होती. या गंभीर घटनेची दखल घेत प्रशासनाने ही धडक कारवाई केली.

सफाई कामगाराची भरती करण्याच्या नावाखाली लाखोंची पावती

मुंबई : मुंबई महापालिकेत सफाई कामगारांना कायम सेवेत घेण्याचा प्रयत्न केला जात असून या कामगारांकडूनच आता विविध कामगार संघटना या सदस्य नोंदणीच्या नावाखाली एक लाख ते दीड लाख रुपये घेतले जात आहे. त्यामुळे काही कामगार हे आपले दागदागिने विकून कामगार संघटनांच्या पावत्या फाडत असल्याचा आरोप सभागृहनेते गणेश खणकर यांनी केला आहे. मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये शिवसेनेच्या यामिनी जाधव यांनी मागील 10 सप्टेंबर 2024 रोजी वारसा हक्काने अनुकंपा तत्वावर भरती करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. ११ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

व्याजदरात 40 बेसिस पॉईंट्सपर्यंत वाढ

मुंबई : बजाज फायनान्स लिमिटेडने १२ ते ६० महिन्यांच्या मुदतठेवींवरील व्याजदरात १५ ते ४० बेसिस पॉईंट्सपर्यंत वाढ केली आहे. सुधारित दर नवीन ठेवी आणि नूतनीकरणासाठी लागू आहेत. नियमित ठेवीदारांना ७.७५ टक्के, तर ज्येष्ठ नागरिकांना ८.१५ टक्क्यांपर्यंत वार्षिक व्याज मिळेल. मुदतठेवींचे नूतनीकरण करणाऱ्यांना अतिरिक्त ०.१० टक्के व्याजाचा लाभ मिळणार असून, नियमित ठेवीदारांसाठी कमाल दर ७.८५ टक्के आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ८.२५ टक्के असेल.

'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण' - रविंद्र चव्हाण

मुंबई : भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काँग्रेसच्या दुटप्पी राजकारणावर टीका करणारी सोशल मीडिया पोस्ट शेअर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा कोलकाता येथील व्हिडिओ शेअर करत त्यांनी काँग्रेसवर जोरदार घणाघात केला. पश्चिम बंगाल भाजप विधिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री बोलत होते. रविंद्र चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले की, 'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण! ज्या राज्यांमध्ये तब्बल ४०-४० वर्षे काँग्रेसचा मुख्यमंत्री होऊ शकला नाही, तिथे त्यांच्याच मित्रपक्षांची सत्ता होती. व्होट चोरीचा आरोप करणारे राहुल गांधी आणि काँग्रेस नेते याबद्दल तोंडातून 'ब्र' देखील काढणार नाहीत. 'चोराच्या उलट्या बोंबा' म्हणतात ते हेच!'

नांदेडमध्ये इरफान कुबडा टोळीवर 'मोक्का'

नांदेड दि १०-(प्रतिनिधी) : नांदेड शहरात दहशतीचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगार इरफान उर्फ कुबडा आणि त्याच्या टोळीला पोलिसांनी 'मोक्का'चा दणका दिला आहे. खून, खुनाचा प्रयत्न, शस्त्रास्त्रांसह दरोडा, प्राणघातक हल्ले, जबरी चोरी अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याच्या पार्श्वभूमीवर टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमांतर्गत (मोक्का) कठोर कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे गुन्हेगारी टोळ्यांचे धाबे दणाणले आहेत.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान इरफान कुबडा टोळीचे संघटित गुन्हेगारीचे जाळे समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आज या प्रस्तावाला मंजुरी दिल्याचे वृत्तात नमूद आहे.

पाच जणांविरुद्ध मोक्क्याची कारवाई

या प्रकरणात मुख्य सूत्रधार म्हणून उल्लेख असलेला इरफान उर्फ कुबडा शेख गुड्डू (वय २६, रा. मगदूमनगर, नई आबादी, नांदेड) याच्यासह फिरदौस उर्फ शाहरुख असलमखान (वय ३२), मोहम्मद परवेज उर्फ छोटू पठाण (वय ३५), शेख इम्रान शेख गौस (वय २२) आणि शेख आयान उर्फ आयान मार्क शेख लतिफ(वय २३) या पाच जणांविरुद्ध मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात उष्णतेचा तडाखा; 5 जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी

मुंबई : राज्यातून परतीच्या मान्सूनने पूर्णपणे माघार घेतली असली, तरी पावसाने उघडीप दिल्यानंतर आता राज्यावर उष्णतेचे मोठे संकट ओढवले आहे. ऑक्टोबर महिन्यातच उन्हाचा पारा वेगाने चढू लागल्याने नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. हवामान विभागाने (IMD) दिलेल्या ताज्या अंदाजानुसार, शनिवार, 10 ऑक्टोबर रोजी राज्यातील हवामानात मोठा बदल झाला असून, 5 प्रमुख जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. कोकण आणि मुंबई परिसर (यलो अलर्ट): पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत उष्ण आणि दमट (Hot & Humid) हवामानाचा जोर वाढला असून या 5 जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' घोषित करण्यात आला आहे.



जागतिक वारसा की उकिरडा अजिंठा लेणीत एमटीडीसी आणि एसटी प्रशासनाचा भोंगळ कारभार

पर्यटकांकडून लाखो रुपयांची वसुली पण सुविधांच्या नावे बोंब, अस्वच्छतेमुळे महाराष्ट्राच्या अब्रूचे वेशीवर धिंडवडे

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी





अतिथी देवो भव ची जाहिरात करत जगभरातील पर्यटकांना साद घालणाऱ्या पर्यटन विभागाचा अजिंठा लेणीत मात्र बोजवारा उडाला आहे अजिंठा लेणीच्या बेस कॅम्पवरील शॉपिंग प्लाझा आणि शटल बस थांब्याला अक्षरश उकिरड्याचे स्वरूप आले असून पर्यटकांकडून लाखो रुपये उकळणारे एमटीडीसी आणि एसटी प्रशासन नक्की झोपा काढतंय का असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे

जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी दररोज हजारो देशी विदेशी पर्यटक येतात लेणीपर्यंत जाण्यासाठी त्यांना एसटीच्या शटल बसशिवाय दुसरा पर्याय नाही मात्र या बसच्या प्रतीक्षेत तासन्तास रांगेत उभ्या राहणाऱ्या पर्यटकांसाठी असलेल्या थांब्यावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे प्रशासनाने पर्यटकांना बसण्यासाठी येथे बाकडे आणि कंपाऊंड बांधले आहे पण या जागेवर कचरा उष्ट्या वस्तू आणि प्राण्यांच्या विष्ठेचे ढीग साचले आहेत दुर्गंधीमुळे तिथे उभे राहणेही कठीण झाले आहे

साफसफाईच्या कंत्राटात गोलमाल : एमटीडीसी आणि एसटी महामंडळ दररोज पर्यटकांकडून तिकीट आणि विविध करांच्या माध्यमातून लाखो रुपयांचा महसूल गोळा करते मग हा पैसा जातो कुठे साफसफाईसाठी नेमलेले कंत्राटदार केवळ कागदोपत्रीच काम दाखवून बिले लाटत आहेत का आणि अधिकाऱ्यांचे या कंत्राटदारांशी साटेलोटे आहे का असे गंभीर प्रश्न या निमित्ताने समोर आले आहेत प्रशासनाला फक्त पर्यटकांचे खिसे कापण्यात रस आहे सुविधा देण्याशी त्यांना काहीही देणेघेणे नाही अशी उद्विग्न प्रतिक्रिया एका पर्यटकाने दिली.

आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी : अजिंठा लेणी हा जागतिक वारसा असल्याने येथे परदेशी पर्यटकांची मोठी वर्दळ असते मात्र येथील हा अस्वच्छतेचा नरक पाहून ते आपल्या देशाबद्दल आणि राज्याबद्दल काय प्रतिमा घेऊन जात असतील याचा विचारही प्रशासनाला राहिलेला नाही

पर्यटन मंत्र्यांनी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भोंगळ कारभाराची तातडीने दखल घ्यावी कामचुकार कंत्राटदारांचे कंत्राट रद्द करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी अन्यथा संतप्त पर्यटकांच्या रोषाला प्रशासनाला सामोरे जावे लागेल असा इशारा देण्यात येत आहे

कर्णपुरा यात्रेचा ठेका 1 कोटी 5 लाखांचा; स्टॉलधारकांना दरवाढीचा फटका!

यंदा 140 ते 150 स्टॉल्स; दरवर्षी 10 टक्के भाडेवाढ कायम, दुष्काळी परिस्थितीत सवलतीची अपेक्षा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी





छत्रपती संभाजीनगर : शहरातील नवरात्रोत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेल्या कर्णपुरा यात्रेला ११ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. यात्रेची तयारी पूर्ण झाली असून, यंदा ठेक्याची रक्कम १ कोटी ५ लाख रुपये आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत स्टॉल्सची संख्या घटली असतानाही छावणी बोर्डाकडून दरवर्षी केली जाणारी १० टक्के भाडेवाढ कायम असल्याने स्टॉलधारकांवरील आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे. दुष्काळी परिस्थिती आणि व्यवसायातील अनिश्चितता लक्षात घेता यंदा तरी भाड्यात सवलत मिळणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कर्णपुरा देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी शहरासह परिसरातील हजारो भाविक यात्रेला भेट देतात. या काळात खाद्यपदार्थ, मिठाई, भेळपुरी, आइस्क्रीम, खेळणी, तयार कपडे आणि विविध वस्तूंचे स्टॉल्स उभारले जातात. आकाशपाळणे, खेळण्यांची रेल्वे आणि मनोरंजनाची विविध साधनेही यात्रेची प्रमुख आकर्षणे असतात. यंदा यात्रेत १४० ते १५० स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. गेल्या वर्षी ही संख्या १५० ते १६० होती. दुष्काळी परिस्थितीमुळे स्टॉल्सच्या संख्येत घट झाल्याची माहिती उदयसिंह राजपूत आणि गंगाधर जाधव यांनी दिली.

भाडेदर कायम; खर्चाचा भार वाढला

छावणी बोर्डाच्या दररचनेनुसार हॉटेल, मिठाईची दुकाने, भेळपुरी, आइस्क्रीम, तयार कपडे, छायाचित्रण आणि अन्य व्यावसायिक स्टॉल्ससाठी १०० चौरस फूट किंवा त्याच्या काही भागासाठी प्रतिदिन ३८५ रुपये भाडे आकारले जाते. आकाशपाळणे, खेळण्यांची रेल्वे आणि मनोरंजनाच्या यंत्रांसाठी प्रतिदिन ६६० रुपये दर आहे. लहान स्टॉल्स आणि किरकोळ विक्रेत्यांसाठी स्वतंत्र दररचना आहे.

स्टॉलधारकांना जागेच्या भाड्याबरोबरच मालखरेदी, वाहतूक, कामगार आणि इतर खर्चही करावे लागतात. यात्रेच्या कालावधीत अपेक्षित ग्राहक मिळतीलच, याची खात्री नसते. त्यामुळे व्यवसायातील अनिश्चितता आणि वाढता खर्च यांचा ताळमेळ घालताना विक्रेत्यांना कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत दरवर्षीची भाडेवाढ त्यांच्यासाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

स्टॉल्स घटले, तरी भाडेवाढ कायम

छावणी बोर्डाकडून दरवर्षी स्टॉल्सच्या भाड्यात १० टक्के वाढ केली जात असल्याचे सांगण्यात येते. यंदा स्टॉल्सची संख्या घटली असतानाही भाडेवाढ कायम असल्याने विक्रेत्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा फोल ठरण्याची शक्यता आहे. दुष्काळी परिस्थितीचा परिणाम व्यवसायावर होत असताना भाडेवाढ टाळावी किंवा किमान काही प्रमाणात सवलत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, यंदा भाडेदरात सवलत दिली जाणार का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. स्टॉलधारकांचा जागेचा भाडेखर्च आणि अन्य खर्च वाढल्यास खाद्यपदार्थ व वस्तूंच्या किमतींवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. परिणामी, यात्रेत खरेदीसाठी येणाऱ्या भाविकांनाही वाढीव दरांचा सामना करावा लागू शकतो.

सुरक्षिततेसह सुविधांची तयारी

यात्रेत भाविकांच्या सुरक्षिततेसाठी परिसरात १२० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. गर्दीचे नियोजन आणि अनुचित प्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी या यंत्रणेचा उपयोग होणार आहे. यात्रेतील रस्ता १० फूट रुंद करण्यात आला असून, धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी दिवसातून दोन वेळा पाणी मारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच सर्व पाळण्यांची सुरक्षितता तपासण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

भाविकांसाठी मोबाईल स्वच्छतागृह वाहन, स्तनपान कक्ष, पिण्याच्या पाण्यासाठी पानपोई आणि मोफत पादत्राणे ठेवण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. सुरक्षितता आणि मूलभूत सुविधांच्या दृष्टीने तयारी पूर्ण झाली असली, तरी स्टॉल्सची घटलेली संख्या आणि कायम असलेली भाडेवाढ यामुळे विक्रेत्यांच्या आर्थिक गणितावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते 103 पोलीस अधिकारी व जवानांना पदके प्रदान

मुंबई : महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील लोक भवन येथे एका दिमाखदार सोहळ्यात 103 पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्य, विशिष्ट सेवा आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी प्रतिष्ठित पोलीस पदके प्रदान करण्यात आली. भारताच्या राष्ट्रपतींकडून 2022 ते 2024 या कालावधीतील स्वातंत्र्य व प्रजासत्ताक दिनानिमित्त जाहीर झालेली ही पदके शुक्रवारी सन्मानपूर्वक वितरीत करण्यात आली.

या विशेष समारंभात राष्ट्रपती शौर्य पदके (2), शौर्य पदके (18), राष्ट्रपतींचे विशिष्ट सेवेसाठीचे पोलीस पदक (3), उत्कृष्ट सेवेसाठीचे पोलीस पदक (4), पोलीस पदके (40) आणि गुणवत्तापूर्ण सेवा पदके (36) अशा एकूण 103 पदकांचा गौरव करण्यात आला.

प्रमुख सन्मानित अधिकारी : या सोहळ्यात उत्कृष्ट आणि कर्तव्यकठोर सेवेबद्दल राज्यातील अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला, ज्यामध्ये प्रामुख्याने खालील अधिकाऱ्यांचा समावेश होता

• निकेत कौशिक (पोलीस आयुक्त, मीरा-भयंदर, वसई-विरार) • विनय कुमार चौबे (पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड) • प्रवीण साळुंखे (अतिरिक्त पोलीस महासंचालक, वाहतूक) • मधुकर पांडे (अतिरिक्त पोलीस महासंचालक, प्रशासन) • प्रवीण कुमार पाडवळ (पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा) • निशीथ मिश्रा (पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण आणि विशेष पथके) Cm देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून केलेल्या 'वारी' डॉक्युमेंट्रीचा जागतिक स्तरावर सन्मान या कार्यक्रमाला गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैस्कर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक (एटीएस) नवल बजाज यांच्यासह अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि सन्मानित जवानांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीत आणि राज्यगीताच्या सुमधूर स्वरांमध्ये या शानदार सोहळ्याची सुरुवात आणि सांगता पार पडली.

या प्रसंगी बोलताना राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी पोलीस दलाच्या धाडसाची आणि अहोरात्र सुरू असलेल्या सेवाभावाची मुक्तकंठानं प्रशंसा केली. कायदा व सुव्यवस्था राखण्यात आणि सार्वजनिक सुरक्षा अबाधित ठेवण्यात महाराष्ट्राच्या पोलिसांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

म्हैसमाळ च्या बालाजी मंदिरात 11 ते 20 ऑक्टोबर दरम्यान ब्रह्मोत्सव आयोजन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद प्रतिनिधी प्रसिद्ध असलेल्या म्हैसमाळ येथील बालाजी मंदिरात श्री वेंकटेश प्रतिष्ठानच्या वतीने वार्षिक ब्रह्मोत्सव समारोह ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. यात विविध धार्मिक कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले आहे व

उत्सवाची सुरुवात ११ ऑक्टोबर रोजी अंकुरार्पण पूजेने होणार असून, १२ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहण होईल. १३ ते १९ ऑक्टोबरदरम्यान उत्सवमूर्ती अभिषेक, नित्य होम व शोभायात्रा काढण्यात येणार आहेत. १६ रोजी महाअभिषेक आणि १७ ऑक्टोबर रोजी कल्याणोत्सव पूजा होणार आहे. २० ऑक्टोबर रोजी ध्वजावतरण, चक्रस्नान व महापूर्णाहुतीने समापन होईल. या १० दिवसांत दुपारी या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशी माहिती संस्थांच्या वतीने आयोजक रवींद्र गादिया, नितीन गादिया, शिरीष गादिया यांनी दिली या उत्साहासाठी भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे गादिया परिवाराच्यावतीने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हकलपट्टीसाठी पाच तास धरणे आंदोलन



हिंगोली : जंतर-मंतर दिल्ली येथे जेनी-झी विद्यार्थी युवकांचे नेते अभिजित दिपके आणि नेहा बोर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देण्यासाठी आणि भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) माध्यमातून १३ कोटी मतदार वगळून संविधान विरोधी निर्णय घेतल्यामुळे त्यांच्या पदावरून तात्काळ हकलपट्टी करून जेलमध्ये टाकावे या मागण्यासाठी कळमनुरी शहरातील नवीन बसस्थानक परिसरातील महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यासमोर भारतीय संविधान-लोकशाही बचाव संघर्ष समिती ता.कळमनुरी च्यावतीने शनिवारी 10 ऑक्टोबर 2026 रोजी पाच तास धरणे आंदोलन करण्यात आले.

कळमनुरी येथील धरणे आंदोलनात कळमनुरी वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड.रवि शिंदे,ॲड. जकी कुरेशी,कॉ.चंपतराव नाईक,डॉ.सतीश पाचपुते, ॲड.आर.आर.कोरडे, दिनेश हनुमंते,सभापती मारोत खांडेकर, डॉ.संतोष बोंढारे,सखाराम उबाळे,चंद्रकांत देशमुख, ॲड.सुनील घोंगडे, ॲड.मोहम्मद इकबाल, ॲड.लुगडे पाटील,मोईन बागवान , ॲड.सय्यद अली जामकर, ॲड . इलियास नाईक,दिनाजी क्षीरसागर,सुनील पाईकराव, प्रदीप मस्के, ॲड.मदन मुठाळ, ॲड.तात्याराव देशमुख,सुरेश काचगुंडे,शेख बाबा,मोहम्मद परवेज,प्रा.गजानन थोरात, विजय बलखंडे,पिराजी इंगोले ,दत्तराव कदम,उत्तम कुरुडे, शेख अमन,ॲड.संतोष नरवाडे, ॲड.मल्हारी खोकले,अक्षय देशमुख, ॲड.धम्मानंद सोनुने, ॲड.प्रभाकर मोरे,ॲड.गुणानंद पतंगे, ॲड.सय्यद अली,गोविंद कदम,बबन डुकरे, शाहीर प्रकाश दांडेकर, सुधाकर मोगले, रामा कंठाळे,शंकर उफाळे,अल्फराज कुरेशी,गोविंद कदम, मुक्तार बागवान, वसंतराव काकडे, बंडू कोरडे,मुंजाजी बर्गे,शेख अमीर अर्शद,मोहम्मद बागवान,एजाज बागवान,शेख नजीर, शेख मुसा,शेख एजाज नुरीमियां, विजय अंभोरे, भारत वायकुळे,लक्ष्मण पोटे,प्रफुल पाईकराव,राजू बाभळे, सुदर्शन वायकोळे यांच्यासह कळमनुरी तालुक्यातील सामाजिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सामील होते .

नवरात्रोत्सवासाठी ; बाजारपेठांत खरेदीची लगबग; कर्णपुरा यात्रेची तयारी पूर्ण; घटस्थापनेसाठी पूजासाहित्य, फुले आणि सजावटीच्या वस्तूंना मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : आदिशक्तीच्या उपासनेचा शारदीय नवरात्रोत्सव रविवारपासून (११ ऑक्टोबर) सुरू होत आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील देवी मंदिरांसह प्रमुख बाजारपेठांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटस्थापनेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी शनिवारी बाजारपेठांत नागरिकांची गर्दी झाली. विशेषतः महिला खरेदीसाठी मोठ्या संख्येने बाहेर पडल्याने पूजासाहित्य, फुले, हार आणि सजावटीच्या वस्तूंच्या विक्रीला वेग आला आहे.

घटस्थापनेसाठी लागणारे कलश, माती, धान्य, नारळ, कापूर, अगरबत्ती, कुंकू, चुनरी तसेच देवीच्या पूजेसाठी लागणाऱ्या विविध वस्तूंना मागणी आहे. नवरात्रोत्सवात देवीची आराधना करण्यासाठी भाविकांकडून घरगुती तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गारखेडा आणि सेव्हन हिल परिसरात देवीच्या आकर्षक मूर्तींच्या खरेदीसाठीही नागरिकांची गर्दी दिसून आली.

शहरातील नवरात्रोत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेल्या कर्णपुरा देवी यात्रेची तयारी पूर्ण झाली आहे. भाविकांच्या स्वागतासाठी छावणी मंडळाकडून ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या असून, यात्रेकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात आले आहेत. छावणी मंडळाच्या यात्रोत्सव समितीचे पदाधिकारी किशोर कच्छवाह, जगन्नाथ दानवे आणि दीपक दानवे यांनी यात्रेची तयारी पूर्ण झाल्याची माहिती दिली.

कर्णपुरा देवी मंदिरासह रेणुका माता मंदिर, सप्तशृंगी देवी मंदिर आणि शहरातील अन्य देवी मंदिरांमध्ये नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन मंदिर परिसरात आवश्यक व्यवस्था करण्यात येत आहे. उत्सवाच्या काळात प्रमुख मंदिर परिसरात पोलिसांचा बंदोबस्त तैनात राहणार आहे.

मिटमिटा येथील श्री सप्तशृंगी माता आणि श्री मच्छिंद्रनाथ मंदिरात ११ ते २० ऑक्टोबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवात नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा, आरती, भजन आणि अन्य धार्मिक उपक्रम होणार आहेत.

रविवारी घरोघरी तसेच कर्णपुरा देवी मंदिरात विधिवत घटस्थापना करून नवरात्रोत्सवाला प्रारंभ होईल. भक्ती, परंपरा आणि उत्साहाचा संगम असलेल्या या उत्सवासाठी शहरातील भाविक सज्ज झाले आहेत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

बाणगंगेचे पावित्र्य, श्रद्धा आणि प्रशासकीय सजगता

मुंबईच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा मानबिंदू असलेल्या वाळकेश्वर परिसरातील प्राचीन बाणगंगा तलावाचे पावित्र्य राखण्यासाठी प्रशासनाने घेतलेली भूमिका आणि नागरिकांनी दाखवलेले सहकार्य हे पर्यावरण आणि संस्कृतीचा समतोल कसा राखला जावा, याचे उत्तम उदाहरण आहे. काही दिवसांपूर्वी तलावात पाण्याचा दर्जा खालावल्यामुळे आणि विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यामुळे माशांचा सामूहिक मृत्यू होण्याची दुर्दैवी घटना घडली होती. या घटेनमुळे तलावाच्या सुरक्षेचा आणि पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. असे असतानाही, पितृपक्षाच्या अंतिम दिवशी शनिवारी शेकडो भाविकांनी आपल्या पूर्वजांचे स्मरण करत श्राद्धाचे विधी अत्यंत श्रद्धेने आणि नियमांचे पालन करत पार पाडले. या संपूर्ण प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) दाखवलेली तत्परता आणि उपाययोजना कौतुकास्पद ठरल्या आहेत. प्रशासनाने तलावाचे पाणी दूषित होऊ नये म्हणून कडक सुरक्षाव्यवस्था तैनात करत तलावाच्या पाण्यात उतरण्यास आणि थेट साहित्य टाकण्यास सक्त मनाई केली. त्याचबरोबर, भाविकांच्या धार्मिक भावना दुखावू नयेत म्हणून बाणगंगा परिसराजवळच तब्बल १० कृत्रिम तलाव तयार करून तिथे पवित्र बाणगंगा तलावातीलच पाणी उपलब्ध करून दिले. याशिवाय, तलावातील पाण्याचा ऑक्सिजन स्तर सुधारण्यासाठी अत्याधुनिक पंप बसवणे आणि ५ ऑक्टोबर रोजी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी व पुरोहितांची संयुक्त बैठक घेऊन सर्वानुमते मार्ग काढणे, हे प्रशासकीय सुसंवादाचे लक्षण आहे. धार्मिक परंपरा आणि श्रद्धा यांचे जतन करतानाच जलस्रोतांचे पर्यावरण टिकवणे ही काळाची गरज बनली आहे. बाणगंगा तलावाच्या या घटनेतून धडा घेऊन केवळ प्रशासनानेच नव्हे, तर नागरिकांनीही आपल्या ऐतिहासिक वास्तू आणि पाण्याचे स्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी पुढे आले पाहिजे. श्रद्धेच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी जादा नाही याची काळजी घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. प्रशासनाची कडक भूमिका, नागरिकांचे सहकार्य आणि पुरोहितांचे मार्गदर्शन यामुळे बाणगंगेचे पावित्र्य अबाधित राखण्यास मदत झाली असून, हा पॅटर्न इतर धार्मिक स्थळांसाठीही मार्गदर्शक ठरावा.

देश: विकसित आणि मागासलेला

एखादा देश विकसित आहे की मागासलेला ? हे कसे ठरवायचे ? याचे साधे आणि सरळ उत्तर म्हणजे ज्या देशात समता आहे,ते देश विकसित समजावे,आणि ज्या देशात विषमता आहे,ते देश मागासलेले समजावेत. अर्थात प्रत्येक क्षेत्रातील मागासलेपण तपासावे लागेल,उदा.आर्थिक,सामाजिक,राजकीय,धार्मिक,सांस्कृतिक,शैक्षणिक,आरोग्य, शेती, तंत्रज्ञान आणि विज्ञान.

जो देश संशोधनात मागे आहे,गरीब आहे,म्हणजेच ज्या देशात विज्ञान आणि तंत्रद्न्यान याचा वापर कमी आहे,तो देश मागासलेलाच समजला पाहिजे. ज्या देशात शिक्षण आणि आरोग्य आणि सेवा दर्जेदार नाही,आणि देशातील साऱ्याच जनतेसाठी मोफत नाही,असा देश मागासलेलाच समजावा.आणि ज्या देशात आरोग्य शिक्षण सुविधा अद्यावत,दर्जेदार,आणि सेवा पण तत्पर आहे,असा देश विकसित समजावा.

ज्या देशात जमीन,शेती,वृक्ष,वनस्पती यांचे संरक्षण केले जाते,त्यांची काळजी घेतली जाते,माती,पाणी,हवा,जंगल हे दूषित केल्या जात नाहीत,त्यावर केमिकलचा वापर न करता सेंद्रिय उपाय योजना केल्या जातात,असे देश विकसित समजावेत,अन्यथा ते देश मागासलेलेच समजावेत.नैसर्गिक समतोल बिघडवणारे देश यांना विकसित न समजता मागासलेलेच समजावेत,मग ते अमेरिका,जपान,जर्मनी,रशिया इत्यादी कुणीही विकसित असले तरी त्यांना विकसित म्हणता येणार नाही.निसर्गाचा - हा स करणारे त्यांना मागासलेलेच म्हटले पाहिजे.आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करणारे देश तेच खरे विकसित समजले पाहिजे.असे देश कोणते ? ते शोधावे लागेल.

जे देश विज्ञान तंत्रज्ञान आणि संशोधन याचा वापर नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश करण्यासाठी होत असेल, तसेच शस्त्रास्त्र आणि न्यूक्लियर आणि बॉम्ब तयार करून मानव जातीचा संवाद करण्यासाठी होत असेल तर अशा संशोधनाचा उपयोग करणारे किंवा असे संशोधन करणारे जे देश आहेत त्यांना मागासलेले देशच असे समजावे, आणि संशोधन हे नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करण्यासाठी किंवा त्यात संवर्धन करण्यासाठी आणि माणसा चे जीवित हानी आणि मालमत्तेची हानी न करणारे असेल तर, तेच संशोधन विकसित समजावे. असेच संशोधन करावे की, ज्यामुळे पशुपक्षी वनस्पती मानव आणि निसर्ग साधन संपत्ती म्हणजेच सजीव आणि निर्जीव नैसर्गिक संपत्तीचा विनाश होणार नाही. ज्या देशाने भरपूर आर्थिक प्रगती केलेली आहे, परंतु त्या देशातील गरीब मध्यम श्रीमंत या वर्गातील दरी किंवा अंतर कमी न होता वाढतच गेले असेल तर ते देश अविकसित किंवा मागासलेलेच समजावेत, जे देश आर्थिक समतेकडे त्यांची वाटचाल चालू आहे असे देशच प्रगतिशील देश समजावेत. आणि या देशाची वाटचाल आर्थिक विषमतेची दरी रुंदावन्याकडे चालू आहे, असे देश मागासलेले च आहेत, असे समजावे.

ज्या देशात रंग, जात, वर्ण, वंश, प्रांत, लिंग या विषयात भेदभाव असेल तर ते देश मार्ग असलेलेच समजावे. ज्या देशात हा सामाजिक भेदभाव नाही तो देश विकसित देश समजावा.

ज्या देशातील सरकार म्हणजे सत्ता देशाला आणि समाजाला आर्थिक आणि सामाजिक समतेकडे नेणारी असेल तर तो देश विकसित समजावा, आणि ज्या देशातील सरकार किंवा सत्ता किंवा शासन समतेकडे न घेऊन जाता विषमतेची वाट दाखवीत असेल, आणि केवळ सुधारण्याच्या नावाखाली किंवा सामाजिक समतेच्या नावाने केवळ दीपा पोती किंवा डागडुजी करीत असेल तर असे देश म्हणजे ' पुढे पण जाऊ नको आणि मागे पण जाऊ नको, तर जैसे थे ' असे ज्या शासनाचे किंवा सत्तेचे धोरण आहे असे देश म्हणजे मागासलेले देशच समजावे. कारण असे केल्याने समता प्रस्थापित होऊ शकत नाही. आर्थिक आणि सामाजिक समतेचे केवळ कायदे केल्यानेही समता प्रस्थापित होतेच असे नाही. कारण कायदे करूनही त्याची अंमलबजावणी जर शासन करत नसेल तर त्या कायद्याचा उपयोग नाही.

ज्या देशात धर्माचा वापर केवळ अंधश्रद्धे साठी होत असेल, धर्माची व्याख्या ज्या देशात सेवा आणि नैतिकता आणि नैतिकता ही नसेल, आणि धर्म म्हणजे केवळ कर्मकांड, आणि दगडाची पूजा असेल, देवळे मज्जिद आणि चर्च बांधून तेथे जर देशसेवा आणि मानव सेवा आणि नैतिकता याचे शिक्षण मिळत नसेल, तर असे देश मागासलेले देश समजावेत, ज्या देशात धार्मिक मागासले पण आहे, ते देश अविकसितच समजावेत. आणि ज्या देशात आणि ज्या देशात धार्मिक मागासले पण नाही असे देश म्हणजे विकसित देश समजावेत. केवळ अंधश्रद्धा जोपासल्याने माणसाचा विकास होत नाही, त्याच्या बुद्धीचा विकास होत नाही. त्याची बुद्धी कुंठीत होते. त्याच्या बुद्धीला कुलूप लागतो. ती विचारशील बनत नाही. असा धर्माचा जर परिणाम होत असेल, तर धर्माचे शिक्षण हे मागे नेणारेच समजावे. तंत्रज्ञान आणि विज्ञान आणि संशोधन या क्षेत्रामध्ये एवढी मोठी प्रगती झालेली असताना, अजूनही बहुसंख्य लोक चंद्राला ग्रह न समजता, चंद्र म्हणजे एक निर्जीव वस्तू न समजता त्यास देव मानून त्याची पूजा करतात, शिकलेले लोक सुद्धा असे करत असतील तर तो माणूस आणि तो देश मागासलेलाच होय.

माणसाच्या जीवनात ' संस्कार ' हा विषय फार महत्त्वाचा आहे, कारण मूल जेव्हा जन्माला येते, तेव्हा ते निस्तृह आणि निष्पाप असते, त्याला हे जग माहीत नसते, जगातील रूढी परंपरा चालीरीती जात धर्म वर्ग काहीच माहित नसतात, जस जसा तो मोठा हो जातो तसतसे त्यावर जसे संस्कार पडतात किंवा मुलांना आई-वडिलांकडून किंवा शेजाऱ्याकडून किंवा समाजाकडून किंवा सरकारकडून जे काही संस्कार केले जातात, त्यानुसार मुलांची विचार तयार होत असतात, आणि जशी विचार बनतात तसे ते कृती करायला लागतात. धर्म जात वर्ग देश या संकल्पना नैसर्गिक नसून या मानवी आहेत, म्हणजेच मानवनिर्मित या संकल्पना आहेत, ज्या माणसा माणसात संकुचित भावना निर्माण करतात, विषमता निर्माण करतात. विद्यमान समाज हा छोट्या मुलांवर देव देश धर्म जात यासाठी जीव द्यायला शिकवतो, माणसाच्या जीवाचे रक्षण करायला शिकवत नाही, देशाच्या नावाने मिलिटरी तयार करण्यात येते, अणुबॉम्ब तयार करण्यात येतात आणि यांचा वापर जगातील मनुष्यसंहार करण्यासाठी केला जातो, भांडवली व्यवस्थेचे, भांडवली सत्तेचे, भांडवलदार आणि जमीनदारांचे हे षडयंत्र कोणाच्याही लक्षात येत नाही, ही दुःखद गोष्ट होय. म्हणूनच तर जगात मानवता धर्म प्रस्थापित होण्याऐवजी शेकडो धर्म तयार झाले, ज्यांना सर्व देश कुरवाळीत बसले आहेत. सगळ्या धर्मात सर्वश्रेष्ठ धर्म म्हणजे मानव धर्म होय. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे, ही मानवतावादी शिकवण साने गुरुजींची, तसेच सोडुनिया भेदभाव बांधा प्रेम गाठी, जगी सर्व एक आहे जात मानवाची ही मानवतावादी शिकवण शाहीर दिगू तुमवाड यांची, लक्षात घेणे आवश्यक आहे. तरच सामाजिक विषमता आणि आर्थिक विषमता सुद्धा नष्ट होऊ शकते. धर्मांध बनवून जर मानवता धर्म ऐवजी विविध धर्मांना कुरवाळीत बसलो तर आर्थिक सामाजिक राजकीयu धार्मिक सांस्कृतिक सर्वच प्रकारची विषमता कायमच राहणार आहे, हे समजून घेण्याची गोष्ट आहे.

माझ्या ह्या लेखात " समजावे "हा शब्द वापरलेला आहे, याचे कारण म्हणजे माणसाची बुद्धीच अशी आहे की, समजून घेतले तर समजते, आणि समजून घेण्याची इच्छाच नसेल तर समजत नाही, समजावे म्हणजेच मान्यता द्यावी, मानावे असा त्याचा अर्थ होतो. मानला तर ईश्वर आहे, जसा म्हणाल तसा धर्म आहे, म्हणजे काय तर शेवटी सर्व काही मानण्यावर असते, म्हणजेच मानसिकता हा विषय महत्त्वाचा आहे. आपल्या मनाची जडणघडण कशी करायची? विषमतावादी की समतावादी ? हे आधी ठरविले पाहिजे, एकदा ठरविले की, मग त्यानुसार आपली बुद्धी कामाला लागते किंवा त्या वाटेला लागते.

थोडक्यात काय तर, समता ही संकल्पनाच विकसित बुद्धीचे लक्षण आहे, आणि विषमता ही संकल्पनाच मागासलेपणाचे लक्षण आहे.

लेखक: दत्ता तुमवाड,

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब अडवणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारण्याबरोबरच कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित संनियंत्रण प्रणाली विकसित करावी. विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. या बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ए.टी.ई. चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा, पानी फाउंडेशनचे सत्यजित भटकळ, अभिनेते आमिर खान, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

नेकनूर पोलीसांच्या कोठडीत आरोपीने घेतली फाशी

बीड : पवनचक्की कंपन्याना पोलिसांकडून मिळणार संरक्षण शेतकऱ्यांच्या मुळावर उठणार आज पर्यंत ठरत आला आहे. पोलीस अधीक्षकांपासून ते साध्या शिपायापर्यंत पोलिसांची भूमिका वादग्रस्त ठरत आली आहे. त्यातच आता आवादा कंपनीच्या चोरी प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीने नेकनूर पोलीसांच्या कोठडीतच फाशी घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या आरोपीवर मकोका देखील लावण्यात आल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे पोलीस ठाण्यातील सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

बालाजी शिंदे (वय २२, रा. वाशी) असे या आरोपीचे नाव आहे. आवादा कंपनीतील चोरीच्या प्रकरणात त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याच्यावर मकोका कायद्यांतर्गतही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे दोन ते अडीच वाजण्याच्या दरम्यान बालाजीने लॉकअपमध्ये पांघरुणाच्या रगचा दोरा उसवून त्याच्या साहाय्याने गळ्याभोवती फास आवळला. हा प्रकार लक्षात येताच पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी तत्परतेने हालचाली केल्या. त्यामुळे त्याचे प्राण वाचले. त्यानंतर त्याला तातडीने बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

नेकनूर पोलीस ठाण्याच्या कारभारावर पुन्हा प्रश्न

नेकनूर पोलीस ठाण्याचे जे कारभारी झाले ते पवनचक्की कंपन्यांचे लाड पुरवणारेच निघाले. हा विषय माध्यमांनी अनेक वेळा हाताळला असला तरी पोलीस अधीक्षकांनी कधीच यावर कारवाई करण्याची तसदी घेतली नाही.

नेकनूर ठाण्याचा कारभार विविध कारणांमुळे चर्चेत राहिला आहे. त्यातच आता पोलीस कोठडीत असलेल्या आरोपीने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना घडल्याने लॉकअपमधील देखरेख, बंदिवानांची सुरक्षा आणि कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांची जबाबदारी याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

पोलिसांच्या ताब्यातील आरोपीने अशा प्रकारचे पाऊल उचलण्यापर्यंत परिस्थिती कशी निर्माण झाली, याची चौकशी होणे महत्त्वाचे आहे. या घटनेची अधिकृत चौकशी आणि त्यातून समोर येणारी माहिती याकडे आता लक्ष लागले आहे.

'फार्म ऑफ द फ्युचर' प्रकल्पाला गती; पिंगळी येथे शेतस्तरीय सूक्ष्म हवामानावर आधारित कृषी सल्ला सेवांचा विकास

कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी पिंगळी येथील प्रकल्पस्थळाला भेट देऊन कामाचा घेतला आढावा

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी महाराष्ट्रातील हवामान अनुकूल आणि माहिती-आधारित शेतीला चालना देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'फार्म ऑफ द फ्युचर' या महत्त्वपूर्ण उपक्रमाला परभणी जिल्ह्यातील पिंगळी येथे गती मिळत आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील स्थानिक हवामान परिस्थितीनुसार अचूक आणि उपयुक्त कृषि सल्ला उपलब्ध करून देण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनातून प्रयत्न सुरू आहेत.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि मार्गदर्शनाखाली आणि या प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक (Principal Investigator) तथा कृषि हवामानशास्त्रज्ञ डॉ. कैलास डाखोरे यांच्या नेतृत्वाखाली परभणी तालुक्यातील पिंगळी गावातील १०० हेक्टर क्षेत्राची निवड करण्यात आली असून, या क्षेत्राचे सर्वेक्षण आणि मूल्यमापन करण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी यांच्या पथकाचे सहकार्य लाभत आहे. खरीप हंगामाच्या मध्यावधीत क्षेत्रीय माहिती संकलन आणि निरीक्षणांची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे.

या उपक्रमांतर्गत क्षेत्रीय निरीक्षणे, हवामानविषयक माहिती आणि पिकांच्या वाढीशी संबंधित विविध घटकांचा एकत्रित अभ्यास व विश्लेषण करण्यात येत आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक



हवामान परिस्थिती, पिकांची अवस्था आणि शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन शेतस्तरावर सूक्ष्म हवामानावर आधारित (Hyperlocal) कृषि सल्ला सेवा विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. सर्वसाधारण हवामान अंदाज आणि प्रत्यक्ष शेतात घ्यावयाचे कृषि व्यवस्थापनविषयक निर्णय यांमधील अंतर कमी करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे.

दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी पिंगळी येथील प्रकल्पस्थळाला भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली आणि प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. हवामानातील बदल आणि अनिश्चिततेमुळे निर्माण होणाऱ्या कृषि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शास्त्रीय संशोधन आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय माहितीच्या आधारे व्यावहारिक उपाय विकसित करण्याचे महत्त्व या भेटीतून अधोरेखित झाले.

डॉ. कैलास डाखोरे आणि त्यांचे पथक शेतस्तरावरील डिजिटल कृषि व्यवस्थेचा शास्त्रीय पाया विकसित करण्यासाठी कार्यरत आहे. स्थानिक हवामान आणि पीक परिस्थितीचा अभ्यास करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजा, अडचणी आणि अपेक्षा समजून घेण्यावरही या प्रकल्पात विशेष भर दिला जात आहे.

भविष्यात या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक हवामानावर आधारित पीक सल्ला, सुधारित पीक निरीक्षण आणि शेती व्यवस्थापनासाठी निर्णय घेण्यास उपयुक्त माहिती अशा विविध कृषि हवामानविषयक सेवा व उत्पादने विकसित करण्याची अपेक्षा आहे. यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी कृषि व्यवस्थापनविषयक निर्णय घेणे, उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे आणि हवामानाशी संबंधित जोखमींचा सामना करणे अधिक सुलभ होऊ शकते.

या प्रकल्पाविषयी आशावाद व्यक्त करताना प्रमुख अन्वेषक डॉ. कैलास डाखोरे यांनी वैज्ञानिक माहिती, स्थानिक हवामान परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या गरजा यांची सांगड घालून भविष्यातील शेती विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पारंपरिक पद्धतीने व्यापक क्षेत्रासाठी दिल्या जाणाऱ्या कृषि सल्ल्यापलीकडे जाऊन माहिती-आधारित आणि शेतविशिष्ट कृषि निर्णय सहाय्य प्रणाली विकसित करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

भाजप महिला मोर्चाचा काँग्रेस कार्यालयावर मोर्चा



मुंबई : जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) ११ विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांवरून भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाने शनिवारी मुंबईत काँग्रेसविरोधात आंदोलन केले. भाजपच्या प्रदेश कार्यालयापासून काँग्रेस कार्यालयापर्यंत धडक मोर्चा काढत काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने या प्रकरणावर भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांनी केली. आंदोलनादरम्यान पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याची माहितीही वाघ यांनी दिली.

काँग्रेस खासदार डॉ. बिमोल अकोइजम यांच्यावरील विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणाचे आरोप आणि त्यासंदर्भातील कारवाईचा मुद्दा उपस्थित करत वाघ यांनी राहुल गांधी, सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यावर टीका केली. संबंधित खासदाराला चौकशीनंतर सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याचा दावा करत, या प्रकरणावर काँग्रेसचे वरिष्ठ नेतृत्व मौन का बाळगून आहे, असा सवाल त्यांनी केला.

सेवा संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी रंगविले विकसित भारताचे स्वप्न

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळाली अभिव्यक्ती!; यशदा पब्लिक स्कूलमध्ये चित्रकला व भाषण स्पर्धा; विजुभाऊ औताडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण, कौशल्य आणि देशभक्तीची कास धरावी, असे आवाहन माजी उपमहापौर विजुभाऊ औताडे यांनी केले. अजिंठा बहुद्देशीय सेवाभावी संस्था, तळणी संचालित यशदा पब्लिक स्कूलमध्ये 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' आयोजित चित्रकला व भाषण स्पर्धेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

विद्यार्थ्यांच्या कल्पनांना मिळाले व्यासपीठ

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'च्या निमित्ताने 'माझ्या स्वप्नातील विकसित भारत' या विषयावर राष्ट्रव्यापी चित्रकला व भाषण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि विचारांतून विकसित भारताचे चित्र मांडले. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नांना रंग दिले, तर भाषणातून देशाच्या प्रगतीविषयीचे विचार व्यक्त केले.



कार्यक्रमाला माजी उपमहापौर विजुभाऊ औताडे, नगरसेविका दया गायकवाड, छाया खाजेकर, कैलास गायकवाड आणि रामदास हरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे उपाध्यक्ष तथा मार्गदर्शक सतीश देशमुख, मुख्याध्यापिका सोनाली बनबरे, शिक्षक गायकवाड सर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

देशाच्या जडणघडणीत विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची

विजुभाऊ औताडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विकसित भारताची संकल्पना स्पष्ट केली. देशाच्या प्रगतीमध्ये विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे असून, शिक्षणासोबतच कौशल्य, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. देशभक्तीची भावना मनात ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याने देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी आवाहन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि देशाच्या विकासाविषयी सकारात्मक दृष्टिकोन रुजण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरत असून, कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील मार्गदर्शक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिजाऊ आयटीआयमध्ये करिअर मार्गदर्शन मेळावा

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी : सेवा संकल्प अभियानांतर्गत जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांना आयटीआय शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या रोजगार, स्वयंरोजगार, अप्रेंटिसशिप, उच्च शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या विविध संधींबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन, परभणी जिल्हा कार्यालयाचे कौशल्य विकास अधिकारी समाधान किरवले, तसेच योगेश एंडपलवार व सचिन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बदलत्या औद्योगिक क्षेत्रात कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी तांत्रिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होऊ शकतात, याबाबत त्यांनी माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी केवळ तांत्रिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता संवादकौशल्य, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन, वेळेचे नियोजन आणि मुलाखतीला सामोरे जाण्याची तयारी यांसारखी कौशल्ये विकसित करावीत, यावर विशेष भर देण्यात आला. रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्वही यावेळी अधोरेखित करण्यात आले. या मार्गदर्शन मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर तरवटे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना औद्योगिक क्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन तांत्रिक कौशल्यांसोबतच व्यक्तिमत्व विकास आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. कौशल्य, ज्ञान आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर विद्यार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल करिअरची वाटचाल निश्चित करावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. एन. एन. चव्हाण यांनी केले. यावेळी जिजाऊ आयटीआयचे प्रशिक्षणार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शिल्पनिदेशक श्री. एन. व्ही. चव्हाण, ए. एम. विभुते, जी. व्ही. रेंगे आणि आर. ए. रसाळ यांनी विशेष प्रयत्न केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून तयार झालेल्या 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' माहितीपटाला आंतरराष्ट्रीय बहुमान

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स 2026'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे.

महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे.

***वारीच्या गौरवशाली परंपरेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान* –**

***मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस* :**

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी 22 मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या तडवी शहादत नब्बास यांचे हॅमर थ्रोमध्ये यश

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत तृतीय क्रमांक



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१० ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचालित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील विद्यार्थिनी शहादत नब्बास यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत हॅमर थ्रो (Hammer Throw) या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २०२६-२७ च्या मध्यवर्ती विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत शहादत नब्बास तडवी यांनी हे उल्लेखनीय यश संपादन केले.वाय.पी.महाविद्यालय,वैजापूर येथे पार पडलेल्या या स्पर्धेत त्यांनी आपल्या क्रीडाकौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल त्यांना विद्यापीठाच्या वतीने Certificate of Merit देऊन गौरविण्यात आले.

शहादत यांच्या या यशामुळे संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली असून, त्यांच्या यशाचे महाविद्यालय परिसरातून कौतुक होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यां मध्ये ही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची क्षमता आहे, हे त्यांनी आपल्या यशातून दाखवून दिले आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,पंकज साबळे,डॉ.निलेश गाडेकर डॉ.सैराज तडवी,तोफिक शेख,डॉ.उल्हास पाटील शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यांचे अभिनंदन केले. तसेच भविष्यातील क्रीडा स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातील प्रगतीही अधोरेखित झाली आहे.

वाघोळ्यात 12 ऑक्टोबरला जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

दिव्यांग विद्यार्थी संकेत वाहटुळे यांच्या हस्ते उद्घाटन; मागील वर्षातील विजेत्या ठरणार प्रमुख पाहुण्या

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

फुलंब्री, प्रतिनिधी : विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना आणि वक्तृत्वकलेला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी वाघोळा (ता. फुलंब्री) येथे सोमवारी (१२ ऑक्टोबर) सकाळी ९ वाजता जिल्हास्तरीय भव्य वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कै. शेषराव पा. गायकवाड स्मृती प्रतिष्ठान, वाघोळा आणि रामेश्वर विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे.

प्रतिष्ठानच्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची १४ वर्षांची परंपरा असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, राजकीय नेते किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्याऐवजी मागील वर्षी स्पर्धेत सहभागी झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्याला उद्घाटनाचा मान देण्यात आला आहे. स्व. श्रीकांत ठाकरे निवासी अपंग विद्यालय, गिरसावळी येथील विद्यार्थी संकेत मधुकर वाहटुळे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. मागील वर्षीच्या विजेत्या विद्यार्थिनी वीरा विवेक चांदोडकर आणि स्वरा अशोक मते प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी 'गावातील सरकारी कर्मचाऱ्यांची ऑनलाइन हजेरी : ग्रामविकासासाठी गरज की पर्याय?', 'गाव बदलले तर भारत बदलेल का?', 'शहराकडे जाणारी पावले गावाकडे वळवता येतील का?' आणि 'दुष्काळाला जबाबदार कोण? कारणे, परिणाम आणि उपाय' हे चार विषय ठेवण्यात आले आहेत.

दोन्ही गटांतील विजेत्यांना ५,५५५ रुपयांचे पारितोषिक: स्पर्धा इयत्ता पाचवी ते आठवी आणि नववी ते बारावी अशा दोन गटांत होणार आहे. दोन्ही गटांतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला प्रत्येकी ५ हजार ५५५ रुपये आणि विजेत्या शाळेला फिरता चषक देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकासाठी २ हजार ५५५ रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी १ हजार ५५५ रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. एका शाळेतून प्रत्येक गटासाठी एकाच विद्यार्थ्याला सहभागी होता येईल. स्पर्धकाने शाळेचे अधिकृत पत्र सोबत आणणे आवश्यक असून, भाषणासाठी सात मिनिटांची वेळ देण्यात येणार आहे. नावनोंदणीची अंतिम मुदत १० ऑक्टोबर २०२६ आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शाळांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे सचिव विकास शेषराव पा. गायकवाड यांनी केले आहे.

सेवा संकल्प अभियानांतर्गत भटके-विमुक्तांना प्रमाणपत्रे वाटप

गंगाखेड येथे विशेष शिबिर संपन्न



हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी *भटके-विमुक्त घटकांतील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, त्यांना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध व्हावीत आणि लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने गंगाखेड येथील केशवनगर येथे आज सेवा संकल्प अभियानांतर्गत भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र वाटप शिबिर संपन्न झाले.

या वेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, उपविभागीय अधिकारी युवराज डापकर, तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे, नायब तहसीलदार केंद्रे, डोडल अजीम यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराला वैदू, डमरे, जोशी, कुडमुडे, नाथ, जोगी, भवरे-वाले यांसह विविध भटक्या-विमुक्त व वंचित समाजांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या शिबिरात नागरिकांना रहिवासी, राष्ट्रीयत्व व इतर आवश्यक प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी पात्र असलेल्या नागरिकांची नावे मतदार यादीत नोंदविण्याची कार्यवाही करण्यात आली. शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न करण्यात आले.

समाजातील उपेक्षित व वंचित घटकांना शासकीय यंत्रणेशी जोडून त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे, कागदपत्रांअभावी शासकीय योजनांपासून वंचित राहणाऱ्या नागरिकांना दिलासा देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

आवश्यक प्रमाणपत्रे, मतदार नोंदणी आणि शासकीय योजनांच्या लाभासाठी एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांना या अभियानाचा लाभ मिळाला.

मनुष्यजन्म समाजासाठी योगदान देण्याची अमूल्य संधी : राजीव जहागिरदार

सर्वपित्री अमावस्येनिमित्त केशव माधव चतुर्वेद पाठशाळेत मोफत सामूहिक तर्पण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : भारतीय धर्मपरंपरेत ८४ लक्ष योनींचा प्रवास केल्यानंतर मिळणारा मनुष्यजन्म अत्यंत दुर्लभ आहे. हा जन्म केवळ स्वतःसाठी जगण्यासाठी नसून समाजासाठी योगदान देण्याची अमूल्य संधी आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागिरदार यांनी केले.

अखिल भारतीय पुरोहित महासंघ आणि मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम यांच्या संयुक्त विद्यमाने आडगाव येथील केशव माधव चतुर्वेद पाठशाळेत सर्वपित्री अमावस्येनिमित्त मोफत सामूहिक तर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जहागिरदार बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आपले जीवन हे केवळ स्वतःच्या कर्तृत्वाचे फलित नसते. आपल्याला मिळालेला देह, संस्कार, कुटुंबपरंपरा, ज्ञान आणि समाजजीवन यामध्ये अनेक पिढ्यांचे योगदान असते. त्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे सर्वपित्री अमावस्या होय.

अखिल भारतीय पुरोहित महासंघाचे मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष तथा मंदिर आयामाचे खडकी भाग सहप्रमुख पं. पद्मनाभ चौधरी यांनी श्राद्ध-तर्पणाच्या धार्मिक महत्त्वाविषयी मार्गदर्शन केले. आत्महत्या, वध किंवा अपघातामुळे मृत्यू झालेल्या तसेच वंशपरंपरा खंडित झालेल्या पितरांसाठी सर्वपित्री अमावस्येला तर्पण करणे महत्त्वाचे मानले जाते. या विधीमुळे पितरांचे स्मरण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण आयुष्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यासाठी समर्पित केलेल्या दिवंगत प्रचारकांच्या नावानेही तर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे पौरोहित्य पं. पद्मनाभ चौधरी, पं. ईश्वर दासमिश्रा, पं. अजय तिवारी आणि पंडित सौरभ गुरुजी यांनी केले. आभार प्रदर्शन करताना भक्ती गणेश मंदिराचे एस. एम. कुलकर्णी यांनी हा स्तुत्य उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी अनिल देशमुख, लक्ष्मण माने, शिवाजी दहीवाळ, उदय कहाळेकर यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे वन्यजीव सप्ताह निमित्त प्राणीशास्त्र विद्यामाने व्याख्यानाचे आयोजन



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.१० ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचालित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे वन्यजीव सप्ताह निमित्त प्राणीशास्त्र विभागाच्या विद्यामाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार उपस्थित होते.तसेच डॉ.रावसाहेब बारोटे प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.अनिल परदेशी,डॉ.डी.आर देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.पुढे बोलत असताना अन्नसाखळीचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.अन्नसाखळीतील प्रत्येक घटक हा अतिशय महत्त्वाचा असून त्याचे विशेष स्थान आहे. गांधीजींनी अहिंसेचे तत्व जे सांगितले ते तत्व वन्यजीव सप्ताह मध्ये पूरक आहे,यावरती त्यांनी प्रकाश टाकला, वन्यजीवांचे संरक्षण ही काळाची गरज असून त्यांचे महत्त्व पर्यावरणामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.पर्यावरणाची साखळी जर तुटली तर त्याचे अनेक परिणाम भविष्यातील पिढ्यावरती होतील असे त्यांनी सांगितले.अनेक दुर्मिळ प्रजाती त्यांनी विद्यार्थ्यांना दाखवल्या त्यांचे महत्त्व त्यांनी पटवून सांगितले तसेच आपल्या भागात सुद्धा विविध प्रजाती आढळतात,त्यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा जेणेकरून वन्यजीव संरक्षण ही संकल्पना सोपी जाईल. तसे डॉ.देशमुख यांनी भारतातील चित्ता संवर्धन याबाबत विवेचन केले.कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून डॉ.रावसाहेब बारोटे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शंतनू चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.रावसाहेब बारोटे यांनी केले.याप्रसंगी डॉ.सुशील जावळे, डॉ.रामेश्वर मगर,डॉ.दीपक पारधे,डॉ.गणेश मिसाळ, डॉ.पंकज गावित,डॉ.संतोष पडघन,डॉ.जी.एस.भगत,पंकज साबळे,राजेंद्र राठोड,सुनील सोळुंके,अश्विनी पाटील, अश्विनी काळे व विज्ञान शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

परभणीत 85 होमगार्ड जवानांना विशेष प्रशिक्षण; उजळणी शिबीर उत्साहात



परभणी : जुना पेडगाव रोड येथील जिल्हा प्रशिक्षण केंद्रात होमगार्ड कार्यालयाच्या मैदानावर महाराष्ट्रातील पहिल्या मानसेवी अधिकारी वर्गाच्या उजळणी प्रशिक्षण शिबिराचा समारोप ५ ऑक्टोबर रोजी झाला.

या शिबिरात परभणी जिल्ह्यातील सुमारे ८५ होमगार्ड जवानांना शारीरिक कवायत, पद कवायत, काठी प्रशिक्षण, श्री नॉट श्री (३०३) रायफल शस्त्र प्रशिक्षण यांसह विविध बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड यांच्यासह मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या जवानांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले.

शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त चंद्रकांत खैरे यांच्याकडून अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राहुल संत, किशोर चव्हाण, कचरू जाधव, विष्णू वखरे, ॲड. सोपान शेजुवळ, बाबासाहेब शेळके, ॲड. शारदा ठोंबरे, गीता सवणे, हिराताई सोनवणे, प्रा. राजकुमार गाजरे श्रीमंगले, नवनाथ घोडके, रवींद्र सहज, सुरेश बोर्ड, निलेश बोराडे, नितीन मोहिते, सचिन गायकवाड, अण्णासाहेब बर्वे, रामेश्वर सवणे, अतुल शेजुळ, गणेश वैद्य, गणेश शेजुळ, भाऊसाहेब नाईक आदी उपस्थित होते.

नोबेल विजेत्यांच्या संशोधनातून विद्यार्थ्यांना प्रेरणा; संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात बॉटनी फोरमचे उद्घाटन; प्रा. विक्रम खिल्लारे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.१० ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत बॉटनी फोरमचे उद्घाटन वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. विक्रम खिल्लारे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी त्यांनी 'नोबेल पारितोषिक विजेते आणि त्यांचे विज्ञानातील योगदान' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करत वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवसंकल्पनांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार होते.

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांच्या कार्याचा घेतला वेध

प्रा. खिल्लारे यांनी आपल्या मार्गदर्शनातून नोबेल पारितोषिक प्राप्त शास्त्रज्ञांच्या जीवनप्रवासाचा आणि त्यांच्या संशोधनकार्याचा वेध घेतला. विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये क्रांतिकारी योगदान देणाऱ्या संशोधकांचे कार्य, त्यांनी लावलेले महत्त्वपूर्ण शोध, त्यांच्या संशोधनामागील जिद्द आणि वैज्ञानिक वाटचालीतील संघर्ष यांची त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून ओळख करून दिली. शास्त्रज्ञांची छायाचित्रे, त्यांच्या कार्याविषयीच्या बातम्या आणि संशोधनाशी संबंधित माहितीच्या आधारे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर विज्ञानविश्वाचा प्रेरणादायी पट उलगडला.

वैज्ञानिक प्रगती ही केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर साध्य होत नसून त्यासाठी जिज्ञासा, निरीक्षणशक्ती, चिकित्सक विचार, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि प्रयोगशीलता आवश्यक असते, हे त्यांनी विविध उदाहरणांतून स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता विज्ञानातील नवनवीन



घडामोडींचा अभ्यास करावा आणि प्रत्येक गोष्टीकडे प्रश्न विचारण्याच्या दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना संशोधनाची दिशा

कार्यक्रमात प्रा. खिल्लारे यांनी विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद विशेष लक्षवेधी ठरला. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना दिली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे उत्तरे देत आपल्या मनातील नव्या संकल्पना आणि संशोधनविषयक कल्पना मांडल्या. या संकल्पनांवर भविष्यात संशोधन करता येईल का, त्यासाठी कोणत्या बाबींचा अभ्यास आवश्यक आहे आणि एखाद्या कल्पनेला शास्त्रीय प्रयोगांची जोड कशी देता येईल, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांच्या कल्पनांचे स्वागत करत त्यांच्या विचारांना संशोधनाची दिशा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या संवादामुळे विद्यार्थ्यांना आपल्या जिज्ञासेला शास्त्रीय अधिष्ठान देण्याची प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे, स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन देणे आणि विज्ञानाकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहण्याची सवय विकसित करणे, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

बॉटनी फोरम ठरणार विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे व्यासपीठ

वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने सुरू करण्यात आलेला बॉटनी फोरम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि बौद्धिक विकासासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना वनस्पतीशास्त्रासह विज्ञानातील विविध घडामोडी, संशोधनाच्या संधी आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन यांची ओळख होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित करणे आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोन निर्माण करणे, या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याची संधी मिळत असल्याचे महत्त्व विशद केले. उपप्राचार्य डॉ. रावसाहेब भारुडे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमास वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.दीपक पारदे, डॉ. शंतनू चव्हाण, डॉ. ज्ञानबा भगत, डॉ. संतोष पडगन, डॉ. विनोद बारोटे, डॉ. पंकज गावित, पंकज साबळे, अश्विनी पाटील, अश्विनी काळे राजेंद्र राठोड सुनील सोळुंके यांच्यासह विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या कार्याची ओळख, वैज्ञानिक संशोधनाची प्रेरणा आणि विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मिळालेले प्रोत्साहन यांमुळे बॉटनी फोरमचा उद्घाटन सोहळा ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला.

भरपाई दिवाळीपूर्वी देण्यासाठी पीक पाहणी वेळेत पूर्ण करा – अग्रवाल

बीड, दि. १० (जिमाका) : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पीक नुकसानीपोटी भरपाई दिवाळीपूर्वी मिळावी, यासाठी पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करून नुकसानीची अचूक नोंद घ्यावी. सोयाबीनचे प्रलंबित पीक कापणी प्रयोग दिवाळीपूर्वी पूर्ण करावेत. दुष्काळाची तीव्रता निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष परिस्थिती आणि तांत्रिक आकडेवारीची पडताळणी करावी. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि रोजगार उपलब्धतेचे प्रभावी नियोजन करावे, अशा सूचना केंद्रीय पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांनी दिल्या.दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आलेल्या केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन पथकाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयात पीकस्थिती, पाणीटंचाई, भूजल पातळी, चारा उपलब्धता आणि शेतकरी मदत वितरणाचा आढावा घेतला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दहा हजारांसाठी तुरुंग रक्षकाने सहकाऱ्याचा पाडला दात!

हर्सूल मध्यवर्ती कारागृहात खाकीतील कर्मचाऱ्यांचीच हाणामारी, आठ महिन्यांपासूनच्या पैशांच्या वादातून मारहाण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

जनतेच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले पोलीस आणि कायद्याची शिस्त राखण्याची जबाबदारी असलेले कर्मचारीच कर्तव्यावर असताना आपापसांत भिडू लागले, तर सर्वसामान्यांनी कोणाकडून सुरक्षेची अपेक्षा ठेवायची? हर्सूल मध्यवर्ती कारागृहात घडलेल्या घटनेने हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अवघ्या दहा हजार रुपयांच्या वादातून एका तुरुंग रक्षकाने सहकाऱ्याच्या तोंडावर बुक्का मारला. या मारहाणीत सहकाऱ्याचा दात पडला. या घडलेल्या प्रकारामुळे कारागृहातील कर्मचाऱ्यांच्या वर्तनाचा मुद्दा चर्चेत आला आहे. आठ महिन्यांचा पैशांचा तगादा, थेट हाणामारी!



महेश दिलीप जाधव (वय ३०, रा. घोडेगाव, जटवाडा रोड) हे हर्सूल मध्यवर्ती कारागृहात तुरुंग रक्षक म्हणून कार्यरत आहेत. गुरुवारी सायंकाळी ५.४० वाजता ते रात्रपाळीच्या फिरत्या ड्युटीसाठी कारागृहात पोहोचले. त्यांनी आपली गाडी गार्ड रूमजवळील पार्किंगमध्ये लावली आणि गणवेश बदलण्यासाठी गार्ड रूममध्ये गेले. त्याचवेळी त्यांचे सहकारी चंद्रशेखर पदमाकर पुरी (रा. भडजी, ता. खुलताबाद) तेथे आले.

जाधव यांनी पुरी यांच्याकडून हातउसने घेतलेले दहा हजार रुपये परत मागितले. आठ महिन्यांपासून ही रक्कम थकीत असल्याची माहिती आहे. याच पैशांवरून दोघांमध्ये वाद झाला. मात्र, पैशांचा हिशेब चुकता करण्याऐवजी वादाने थेट मारहाणीचे रूप घेतले. पुरी यांनी जाधव यांच्या तोंडावर बुक्का मारल्याने त्यांचा दात पडला आणि ते जखमी झाले.

कर्तव्यावर असताना शिस्त पाळणे, संयम राखणे आणि कायद्याच्या चौकटीत राहून वागणे ही प्रत्येक सुरक्षा कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे. वैयक्तिक आर्थिक व्यवहारातून मतभेद होऊ शकतात; मात्र त्यातून सहकाऱ्यावर हात उचलण्यापर्यंत मजल जाणे गंभीर आहे. विशेष म्हणजे, ही घटना कारागृहासारख्या शिस्तीला प्राधान्य असलेल्या ठिकाणी घडली.

कर्मचाऱ्यांनीच कर्तव्यावर असताना वैयक्तिक वादातून मारहाण केली, तर शिस्तीचा धाक कोण निर्माण करणार? एका घटनेवरून संपूर्ण पोलीस किंवा कारागृह प्रशासनाला दोषी ठरवता येणार नाही; मात्र अशा प्रकारांमुळे सुरक्षा यंत्रणेच्या शिस्तीबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी कर्तव्यावरील प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या वर्तनातून जबाबदारीचे भान दाखवणे गरजेचे आहे.

मारहाणीत जखमी झालेल्या महेश जाधव यांनी घाटी रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर हर्सूल पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून चंद्रशेखर पदमाकर पुरी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवगिरी महाविद्यालयात नशामुक्त भारत, विकसित भारत अभियान

घाटीच्या मनोरुग्णशास्त्र विभागातर्फे जनजागृती; 300 विद्यार्थ्यांचा सहभाग



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : तरुणांना व्यसनांपासून दूर ठेवून व्यसनमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने देवगिरी महाविद्यालयात 'नशामुक्त युवा, विकसित भारत' जनजागृती मोहीम राबविण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील मनोरुग्णशास्त्र विभाग आणि विशेष तज्ज्ञ परिचारिकांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

'नशामुक्तीचा संकल्प, समृद्ध भारताचा पाया' हा संदेश देत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी तज्ज्ञांनी व्यसनांचे दुष्परिणाम, त्यातून निर्माण होणाऱ्या शारीरिक व मानसिक समस्या आणि व्यसनमुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या उपाययोजनांविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.

कार्यक्रमात घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, देवगिरी महाविद्यालयाच्या डॉ. सबिहा शेख, संचालक डॉ. रामेश्वर गायकवाड, मनोरुग्णशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रसाद देशपांडे, सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रदीप देशमुख, सहायक प्राध्यापक डॉ. स्नेहदीप जाधव, वरिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद चाबुकस्वार आणि मेट्रन अलका वळवी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मनोरुग्ण तज्ज्ञ परिचारिका विद्या पुष्पेंद्र निकुंभ आणि मनोरुग्ण तज्ज्ञ परिचारक महेंद्र सावळे यांच्यासह संजय रहाणे, जगदीश पाटील, भाग्यश्री शेप, मंजरी साळवे, प्रमिला गुडेकर, भारती साळवे, अमोल खंडागळे, रवी मोरे, आशिष दौडे आणि अमरसिंह ढाकणे यांनी व्यसनमुक्तीविषयक पथनाट्य सादर केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

फोर्ब्स कंपनीच्या सीएसआर निधीतून एन-7 शाळेची सात कोटींची इमारत पूर्ण

22 वर्गखोल्या; संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि मोफत सिटी बस सुविधेमुळे विद्यार्थ्यांना लाभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सिडको एन-७ येथील महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम फोर्ब्स कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) पूर्ण झाले आहे. सुमारे सात कोटी रुपये खर्चाच्या या इमारतीत २२ वर्गखोल्या असून, शाळेत शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थी प्रगती करत आहेत.

२०१८ पूर्वी शाळेची इमारत जुनी होती. तत्कालीन मुख्याध्यापिका हेमलता भुयार यांनी फोर्ब्स कंपनीशी संपर्क साधून निधी मिळवला. चार टप्प्यांत बांधकाम पूर्ण झाले. २०१८ मध्ये चार, २०२२ मध्ये पाच, २०२५ मध्ये सहा आणि २०२६ मध्ये सात वर्गखोल्या बांधण्यात आल्या.



डी मार्ट एज्युकेशन फाउंडेशनतर्फे २० संगणकांची प्रयोगशाळा, दोन हजार पुस्तकांचे ग्रंथालय आणि आवश्यक शिक्षक उपलब्ध करून देण्यात आले. प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्याध्यापक मनोज अग्रवाल यांच्या प्रयत्नांतून ऑगस्ट २०२६ मध्ये विद्यार्थ्यांसाठी मोफत सिटी बस सेवा सुरू झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्यास मदत झाली.

क्रीडा क्षेत्रात श्रुतिका बोळगे हिने वेटलिफ्टिंगमध्ये जिल्हास्तरीय सुवर्णपदक, तर आराध्या कुबेर हिने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. प्राजक्ता शामस्कर हिने गांधी साहित्य संमेलनातील निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांकासह सहा हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबवले जात आहेत.

गौशाळा संचालक महत्वपूर्ण.पालक मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासोबत बैठक

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी - महाराष्ट्र शासन राज्यमंत्री महोदया*मा.मेघनादिदि साकोरे बोर्डीकर* परभणी जिल्हा पालकमंत्री यांच्या सोबत आताच्या दुष्काळ परिस्थितीमुळे गौशाळेतील गौवंश,गौशाळा संचालक,गौपालक शेतकरी यांच्या वर चारापाण्याचे भिषण संकट निर्माण झाले आहे.

मा.मंत्री महोदया आणि परभणी जिल्ह्यातील सर्वच गौशाळा संचालक यांची



बैठक *दि.12/10/2026 सोमवार,शेतकरी भवन,परभणी येथे सकाळी 11.00 वाजता* आयोजित करण्यात आली आहे.

याकरिता परभणी जिल्ह्यातील सर्वच गौशाळा संचालक यांनी अवर्जुन उपस्थित रहावे.

करमाड येथील राज्यस्तरीय औषधी भांडाराच्या सुविधांचा आढावा

प्रभारी उपसंचालक डॉ. दयानंद मोतीपावळे यांची पाहणी; प्रलंबित विकासकामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : करमाड येथील राज्यस्तरीय औषधी भांडार व प्रशिक्षण केंद्रातील पायाभूत सुविधांची प्रभारी उपसंचालक डॉ. दयानंद मोतीपावळे यांनी पाहणी केली. केंद्रातील उपलब्ध सुविधा, प्रलंबित विकासकामे आणि औषध साठवणुकीसाठी असलेल्या व्यवस्थेचा आढावा घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



या पाहणीदरम्यान केंद्राच्या इमारतीची स्थिती, स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधा, औषध साठवणुकीसाठी उपलब्ध जागा तसेच विविध विभागांच्या व्यवस्थेची तपासणी करण्यात आली. केंद्राचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधांमधील त्रुटी आणि प्रलंबित बाबींचा आढावा घेण्यात आला.

केंद्रातील पायाभूत सुविधा दर्जेदार, सुरक्षित आणि कार्यक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रलंबित कामांना प्राधान्य देऊन ती वेळेत पूर्ण करावीत. विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करू नये, असे निर्देश डॉ. मोतीपावळे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले. तसेच कामांची नियमित पाहणी करून प्रगतीवर लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. राज्यस्तरीय औषधी भांडार व प्रशिक्षण केंद्र हे औषध साठवणूक, व्यवस्थापन आणि आरोग्य विभागातील प्रशिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने येथील पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, प्राचार्य डॉ. संतोष कडले, ग्रामीण रुग्णालय करमाडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. डोंगळीकर, प्रभारी विभागीय उपअभियंता अनिल चव्हाण, कनिष्ठ अभियंता समीर चौधरी, अनिल सानप आणि चंदन गणोरे उपस्थित होते.

अरुण नाथ गिरीजी महाराज याना दिल्ली येथे धर्मनाथ पुरस्कारा ने सन्मानित

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान प्रमुख स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज भामाठाण तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर यांना दैनिक राष्ट्र सह्याद्री यांच्यावतीने महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या धर्मनाथ पुरस्काराने महाराष्ट्र राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सन्मानित



अतिशय महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या धर्मनाथ पुरस्काराने सन्मानित करून पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागात धार्मिक वैभव प्राप्त करणारे गुरुवर्य स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज यांच्या वतीने धार्मिक सामाजिक अन्नदान हिंदू धर्माचा प्रचार प्रसार . वारकरी संप्रदाय साठी विविध उपक्रम. गोरगरिबांच्या मुलासाठी अध्यात्मिक शिक्षण नवनाथ संगीत कथा. राम कथा भागवत कथा प्रसिद्ध कीर्तना कार म्हणून महाराष्ट्रभर व इतर राज्यांमध्ये त्यांच्या कार्याचा उल्लेख होतो

व चालू असलेले मोठ्या प्रमाणात चालू असलेल्या कार्याची दखल घेऊन पुरस्कारासाठी त्यांची निवड करून महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील केंद्रीय मंत्री भारत सरकार. रामदासजी आठवले यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे नवीन महाराष्ट्र सदन भवन येथे पुरस्कार मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन सोहळा विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला

आहे या पुरस्काराबद्दल महाराष्ट्रभरातील विविध संत महंत. भक्त मंडळ परिवाराच्यावतीने स्वामी गुरुवर्य अरुणा नाथ गिरीजी महाराज यांचे अभिनंदन होत असून हे कार्य पुढे असेच चालू राहो यासाठी महान संत गुरुवर्य नारायण गिरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आपल्या हातून हिंदुत्व विचार किर्तन प्रवचन कथा हे अखंडपणे चालत राहावे अडबंगनाथ संस्थान प्रमुख

शासकीय नोकरीसाठी जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करा : डॉ. भारत गोरे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वाळूज येथील राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या वतीने करिअर समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात करिअर कट्टा संसद मंडळाची स्थापना करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. भारत गोरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शासकीय नोकरी मिळविण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सातत्याने अभ्यास करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षांची योग्य नियोजनाने तयारी केल्यास स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणे शक्य आहे. शासकीय सेवेत महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी मिळाल्यास समाजसेवा करण्याची मोठी संधीही उपलब्ध होते, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. निशिकांत आलटे होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर चाटसे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्टा समन्वयक डॉ. संजय कांबळे यांनी केले.

डाक विभागाचा नावलौकिक वाढवण्यासाठी सर्वांनी उद्दिष्ट पूर्ण करावे: डाक अधीक्षक एस. आर. पाठक

जिंतूर प्रतिनिधी :जिंतूर उपविभागातील कर्मचाऱ्यांनी 'ईच वन इन्श्युअर वन' (EOIO) या मोहिमेत बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत माननीय डाक अधीक्षक श्री. एस. आर. पाठक यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन कर्मचाऱ्यांचा शुक्रवार रोजी विशेष गौरव करण्यात आला.

तसेच २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षात पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक (POSB) योजनेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जीडीएस बीपीएम (GDS BPM) कर्मचाऱ्यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

या विशेष सत्कार



सोहळ्याच्या प्रसंगी डाक अधीक्षक सतीश पाठक, परभणीचे सहाय्यक डाक अधीक्षक गणेश देशमाने, जिंतूर उपविभागाचे डाक निरीक्षक बालासाहेब शिंदे, मार्केटिंग ऑफिसर सचिन कदम, जिंतूरचे पोस्टमास्टर शेख इरशाद, भगवानराव वैद्य, गजानन जाधव आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना मान्यवर अधिकाऱ्यांनी, चालू आर्थिक वर्षात सर्व कर्मचाऱ्यांनी दिलेली उद्दिष्टे पूर्ण करून विभागाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास जिंतूर उपविभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खोपटा पुलाच्या दुरुस्तीच्या कामाची पाहणी; वाहतूक कोंडीतून जनतेची लवकरच सुटका होण्याची अपेक्षा!

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड

उरण तालुक्यातील खोपटा पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याने या मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे विद्यार्थी, नोकरदार वर्ग, वाहनचालक तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जनतेची ही गैरसोय लक्षात घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने खोपटा पुलाच्या दुरुस्तीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

यावेळी शिवसेनेचे माजी आमदार मनोहर शेठ भोईर, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष दादा ठाकूर, मनसेचे डॉशिंग नेतृत्व तथा उरण तालुका अध्यक्ष ॲड. सत्यवान पंढरीनाथ भगत, उरण पंचायत समिती सदस्या कविता पाटील, सार्वजनिक



बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण साहेब, उरण-पनवेल उपअभियंता एम. डी. पाटील , शिवसेना तालुका संघटक रुपेश पाटील, मनसे तालुका उपाध्यक्ष राकेश भोईर, तसेच शिवसेनेचे विभागप्रमुख आणि दोन्ही पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या पाहणीदरम्यान पुलाच्या दुरुस्तीच्या कामाचा दर्जा, काम पूर्ण होण्यास लागणारा कालावधी आणि नागरिकांची वाहतूक कोंडीतून कधी सुटका होणार, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार, १० ऑक्टोबरपर्यंत पुलावरील वाहतूक पूर्णपणे सुरू करण्यात येईल, तसेच पुलाच्या दोन्ही बाजूंच्या जोडरस्त्यांचेही डांबरीकरण करण्यात येईल असे सांगण्यात आले.

जनतेच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न लक्षात घेता, संबंधित विभागाने दिलेल्या आश्वासनाची वेळेत पूर्तता करावी आणि काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आणि जनहिताच्या प्रश्नांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) एकत्रितपणे आवाज उठवत राहतील असे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911